# ‘विश्वकर्मा’मध्ये इमर्सिव्ह तंत्रज्ञानाचे धडे

पुणे : विद्यार्थ्यांना इमर्सिव्ह तंत्रज्ञानाचा अभ्यास करता यावा, यासाठी विश्वकर्मा विद्यापीठामध्ये विश्वकर्मा-युनिटी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यात येणार आहे. त्या संदर्भात विश्वकर्मा विद्यापीठ आणि युनिटी टेक्नॉलॉजीजदरम्यान सामंजस्य करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. इमर्सिव्ह तंत्रज्ञानाआधारे आभासी अनुभव निर्माण करता येतात. आभासी तंत्रज्ञानाधारित व्हिडिओ गेम्स निर्मितीत युनिटी टेक्नॉलॉजीज आघाडीवर आहे. युनिटी टेक्नॉलॉजीजचे तज्ज्ञ विश्वकर्मा विद्यापीठाचे विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत. इमर्सिव्ह तंत्रज्ञानाचे व्हर्च्युअल रिएलिटी, ऑगमेंटेड रिॲलिटी आणि मिक्स्ड रिॲलिटी असे तीन प्रकार आहेत. या तिन्ही तंत्रज्ञानांचा वापर ऑटोमोटिव्ह, वाहतूक, वास्तुरचना, कायदा, कला आणि संरचना, माध्यमे, पर्यटन, मानसशास्त्र आदी विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर होतो आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयातील पदवीच्या जोडीने या तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे ही काळाची गरज बनली आहे. विश्वकर्मा-युनिटी सेंटर ऑफ एक्सलन्सच्या निर्मितीमागे हेच महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, असे विद्यापीठातर्फे सांगण्यात आले.